Nagpur Municipal Corporation
जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर
E-NewsLetter
मार्च २०१७

# नंदा जिचकार, वंदना चांदेकर, स्नेहा निकोसे यांचे महापौर पदासाठी नामांकन




**नागपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाकरीता १ मार्च रोजी अर्ज दाखल**

नागपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाकरीता १ मार्च रोजी म.न.पा. च्या केंद्रीय कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्थायी समिती कक्षामध्ये निगम सचिव हरिश दुबे यांच्याकडे उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले. महापौर पदाकरीता तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून सर्वप्रथम भा.ज.पा. तर्फे नंदा शरद जिचकार, कॉंग्रेसतर्फे स्नेहा विवेक निकोसे यांनी तर ब.स.पा. तर्फे वंदना राजू चांदेकर यांनी महापौर पदासाठी अर्ज दाखल केले.

उपमहापौर पदाकरीता तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केलेत. त्यामध्ये भा.ज.पा. तर्फे दीपराज भैय्याजी पार्डीकर यांनी अर्ज दाखल केला. यावेळी विद्यमान महापौर प्रवीण दटके, उपमहापौर सतीश होले, आमदार प्रा. अनिल सोले, सुधाकर कोहळे, सुधाकर देशमुख, कृष्णा खोपडे, दयाशंकर तिवारी, संदीप जोशी, संदीप जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर कॉंग्रेसतर्फे नितीश ग्वालबंशी व ब.स.पा. तर्फे नरेंद्र नत्थुजी वालदे यांनी उपमहापौर पदाकरीता उमेदवारी अर्ज निगम सचिवांकडे सोपविले.

महापौर पदाकरीता प्राप्त झालेले अर्ज खालील प्रमाणे: १) नंदा शरद जिचकार प्रभाग ३७ (क) सूचक - प्रवीण दटके, अनुमोदक - सतीश होले २) नंदा शरद जिचकार प्रभाग ३७ (क)- सूचक - मायाताई इवनाते, अनुमोदक - चेतना टांक ३) नंदा शरद जिचकार प्रभाग ३७ (क) सूचक - संदीप जोशी, अनुमोदक -दयाशंकर तिवारी ४) वंदना राजू चांदेकर प्रभाग ६ (ब) सूचक - वैशाली नारनवरे, अनुमोदक-संजय बुर्रेवार ५) वंदना राजू चांदेकर प्रभाग ६ (ब) सूचक - जितेंद्र घोडेस्वार, अनुमोदक - मो. जमाल. मो. इब्राहिम शेख ६) स्नेहा विवेक निकोसे प्रभाग ९ (अ) सूचक- तनाजी वनवे, अनुमोदक - दर्शनी धवड

उपमहापौर पदाकरीता प्राप्त झालेले अर्ज खालील प्रमाणे १) दीपराज भैय्याजी पार्डीकर प्रभाग क्र २० (क) सूचक - धर्मपाल मेश्राम, अनुमोदक - भूषण शिंगणे २) दिपराज भैंय्याजी पार्डीकर प्रभाग क्र २० (क)- सूचक - संदीप जोशी, अनुमोदक - प्रगती पाटील ३) नरेंद्र नत्थुजी वालदे प्रभाग क्र ९ (ड)- सूचक - ममता सहारे, अनुमोदक - भूषण शिंगणे ४) नरेंद्र नत्थुजी वालदे प्रभाग क्र ९ (ड)- सूचक - विरंका भिवगडे, अनुमोदक - इब्राहिम तौकिफ अहमद ५) नितीश ग्वालबंशी प्रभाग क्र १० (क)- सूचक - साक्षी राऊत, अनुमोदक - संजय महाकाळकर

नामनिर्देशन पत्राची छानणी, उमेदवारी मागे घेणे व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नावे पीठासीन अधिकारीद्वारा दिनांक ५ मार्च २०१७ रोजी राजे रघूजी भोसले नगर भवन (महाल टाऊन हॉल) येथे होणाऱ्या विशेष सभेत जाहीर होणार असून आवश्यक असल्यास त्याच दिवशी या सभेत मतदान होईल.

• • • • • • • • • • • •

# दहा वर्षातील कार्याचे श्रेय सहकाऱ्यांना – प्रवीण दटके

### मावळत्या महापौरांनी मानले आभार

मागील पाच वर्ष किवा दहा वर्षात नगरसेवक किंवा महापौर म्हणून जे काही कार्य करु शकलो त्या सर्व कार्याचे श्रेय नागपूर महानगरपालिकेतील समस्त कर्मचारी, प्रशासकीय पदाधिकारी, नगरसेवक तसेच पत्रकारांना देतो. माध्यमांनी सातत्याने आमच्या कार्याला प्रसिद्धी दिली, त्यांचे आभार मानतो, असे उद्गार मावळते महापौर प्रवीण दटके यांनी पत्रपरिषदेत काढले.

शुक्रवार ४ मार्च २०१७ रोजी मनपा मुख्यालयातील स्थायी समिती सभागृहात सदर पत्रपरिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी मावळते सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी, नगरसेवक संदीप जोशी, मावळते परिवहन समितीचे सभापती नरेंद्र बोरकर, मावळते स्थायी समितीचे अध्यक्ष सुधीर राऊत, नगरसेविका व भाजपच्या महापौरपदाच्या उमेदवार नंदाताई जिचकार यांच्यासह समस्त मावळते व नवनिर्वाचित नगरसेवक उपस्थित होते.

यावेळी प्रवीण दटके यांनी मागील दहा वर्षात,विशेषत्वाने अडीच वर्षात केलेल्या कार्याचा आढावा घेतला. शहरातील विविध भागातील रसत्यांचे डांबरीकरण, पाण्याचे पुर्नचक्रीकरण व पुर्नवापर, पारदर्शी ई-प्रशासन, विवेकानंद स्मारकाचे लोकार्पण, सुरेश भट सभागृहाचे बांधकाम, विवेकानंद इनडोअर स्टेडियमचे लोकार्पण, महाल येथील बॅडमिंटन कोर्टाचे लोकार्पण, वाठोडा येथील देशातील सर्वात मोठे साई क्रीडा संकुलाचे लोकार्पण, गांधी सागर तलावाचे सौंदर्यीकरण व पूनर्बांधणीकर, महिला उद्योजिका मेळावा, इतवारी येथील रेल्वे उड्डाण पुलाचे लोकार्पण,, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण, नागपूर मनपाच्या १५१ वर्ष पूर्णत्व समारोह मा. राष्ट्रपती, मा. राज्यपाल व मुख्यमंत्री यांची उपस्थिती, २१ हजार योग साधकांनी आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन, महापौर कबड्डी स्पर्धा, शिवशाही कबड्डी स्पर्धा, राष्ट्रीय खो-खो स्पर्धा, अर्ध मॅरॉथॉन व वृद्ध नागरिकांसाठी ‘ महापौर चषक ’ वॉक थॉन स्पर्धा, विवेकानंद सार्धशताब्दीनिमित्त कन्याकुमारी ते नागपूर पर्यंत १९४८ किलोमीटर स्केटिंग रॅलीचे आयोजन, १९६५ च्या युद्धातील सैनिकांचा सत्कार, २५० कोटी रुपयांचा एसटीपी भांडेवाडी प्रकल्प, दहा झोनमध्ये ग्रीन जीमची कामे, तीन हजार घरांमध्ये सोलर वॉटर हिटरची सुविधा, बांबू उपवन निर्मिती, रोटरीच्या सहकार्याने सुलभ शौचालयांची निर्मिती, बगिच्यांच्या सौंदर्यीकरणासाठी ३.७१ कोटींचा खर्च, ग्रीन बसेस व रेड बसेसचा नावीन्यपूर्ण प्रकल्प, मनपा शाळांना प्राप्त झालेले आयएसओ प्रमाणपत्रे, नागपूर महोत्सव इत्यादी विविध प्रकल्प व उपक्रमांचे आयोजन मागील अडीच वर्षात माननीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाने पूर्ण केल्याची माहिती दिली.

थोडक्यात महापौर पदाच्या त्यांच्या कार्यकाळात प्रशासन, स्वच्छता, परिवहन, क्रीडा, सांस्कृतिक, शिक्षण इत्यादी विविध क्षेत्रात त्यांनी केलेल्या कामगिरीची तसेच लोकोपयोगी उपक्रमांची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. भविष्यातील सुंदर शहर व खऱ्या अर्थाने स्मार्ट सिटी म्हणून उदयास येणाऱ्या नागपूर शहर नव्या महापौर यांच्या नेतृत्वात वेगाने वाटचाल करील असा आशावादही त्यांनी यावेळी व्यक्त केला. नागरिकांनी आमच्यावर जो विश्वास टाकला त्या जाहीरनाम्याचे, वचननाम्याचे पूर्णपणे पालन केले जाईल अशी भावना त्यांनी व्यक्त केली. ‘ एक खिडकी योजना ’ तसेच ‘ नागपूर मॅरेथॉन ‘ ही दोन स्वप्ने अपूर्ण राहिली ती लवकरच नव्या महापौरांच्या कार्यकाळात पूर्ण करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. ‘ सबका साथ सबका विकास ’ हे भारतीय जनता पक्षाचे ब्रीदवाक्य आहे. याच अंतर्गत नव्याने निवडून आलेल्या समस्त १५१ नगरसेवकांचे लवकरच प्रशिक्षण घेण्यात येईल, विकासाच्या प्रश्नावर विरोधी पक्षाचेदेखिल सहकार्य यावेळी आम्हाला मिळाले असे त्यांनी सांगितले. सुंदर व स्मार्ट सिटीसाठी जनतेनेदेखिल थोडा त्रास सहन करावा व पुढील काळात काही कठोर निर्णय आर्थिक बाबतील घ्यावी लागणार आहे यात सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

• • • • • • • • • • • •

# आपली बस सेवा सुरळीत सुरू

**परिवहन समिती सभापतींची मोरभवन येथे भेट**

नागपूरकरांना दर्जेदार सार्वजनिक परिवहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ‘आपली बस’ सेवेमध्ये आज शनिवारपासून नागपूरच्या सर्व रस्त्यांवर १८२ बसेस धावल्या. येत्या दोन दिवसात उर्वरित ५५ बसेस धावतील, अशी माहिती परिवहन समिती सभापती बाल्या बोरकर यांनी मोरभवन बसस्थानकावर दिली आहे.

यावेळी परिवहन व्यवस्थापक शिवाजी जगताप, प्रशासकीय अधिकारी व्यवस्थापक अरूण पिपरूडे आदी उपस्थित होते. आतापर्यंत जुन्या ऑपरेटरच्या २३७ बसेस पूर्णपणे हस्तांतरीत झाल्या असून ८ ते ३० मार्चपर्यंत नागपूर शहरात सुमारे ११५ नवीन बसेस, चालू बसेस १८२ तसेच अन्य ५५ बसेस अशा एकूण ३६२ बसेस धावतील, असेही ते यावेळी म्हणाले.

मे. वंश निमय या जुन्या बस संचालकासोबत काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही नवीन ऑपरेटरसोबत ‘आपली बस’ मध्ये काम करण्याची संधी देण्यात आली आहे. मार्चअखेरपर्यंत शहरात नवीन अद्ययावत आणि सुविधायुक्त बसेस दाखल होणार असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन परिवहन समिती बाल्या बोरकर यांनी केले आहे. विशेष म्हणजे, सध्या सुरू असलेली बस सेवा सुरळीत आहे की नाही हे तपासण्यासाठी श्री. बोरकर यांनी स्वत: पारडी ते बर्डी, बर्डी ते जयताळा, जयताळा ते हिंगणा आणि बर्डी ते काटोल रोड असा प्रवास केला.

**३० एप्रिलपर्यंत पासेस ग्राह्य**

सध्या पासधारकांचे अस्तित्वात असलेली पास ३० एप्रिलपर्यंत ग्राह्य धरण्यात येतील. त्यानंतर नवीन पासकरिता त्यांना कार्यालयात अर्ज सादर करावा लागणार आहे.

**शहरात धावणाऱ्या बसेसची संख्या**

१) बेसा ते गोरेवाडा -८

२) पारडी ते जयताळा-पारडी (मार्गे महाल)-९

३) खरबी ते पन्नासे ले-आऊट-९

४) सीताबर्डी ते ब्राह्मणी फाटा-७

५) सीताबर्डी ते कामठी (मार्गे इंदोरा चौक)-९

६) सीताबर्डी ते खापरखेडा-१२

७) सीताबर्डी ते कोराडी-१

८) पिपळाफाटा ते हजारीपहाड-१०

९) सीताबर्डी ते पिपळाफाटा-३

१०) सीताबर्डी ते बुटीबोरी-१६

११) सीताबर्डी ते सीआरपीएफ-३

१२) सीताबर्डी ते सोनेगाव-१

१३) पारडी ते वायसीसी-९

१४) सीताबर्डी ते नारा नारी-७

१५) सीताबर्डी ते यशोदरा-नागसेनवन-५

१६) सीताबर्डी ते कामठी (मार्गे शांतीनगर)-७

१७) सीताबर्डी ते बनवाडी-१

१८) सीताबर्डी ते डिफेन्स-१२

१९) सीताबर्डी ते गोंडखैरी-१

२०) सीताबर्डी ते आलेसूर-१

२१) सीताबर्डी ते बहादुरा फाटा-१०

२२) सीताबर्डी ते वडधामना-१

२३) सीताबर्डी ते पारडी (मार्गे गांधीबाग)-८

२४) सीताबर्डी ते हिंगणा ग्रामीण हॉस्पीटल-२१

२५) सीताबर्डी ते ईसासनी-३

२६) सीताबर्डी ते गोधनी-६

• • • • • • • • • • • •

# नंदा जिचकार यांची महापौरपदी निवड



**दीपराज पार्डीकर उपमहापौर**

महापौर व उपमहापौरपदाच्या निवडणुकीत अनुक्रमे भाजपाच्या नंदाताई जिचकार व दीपराज पार्डीकर विजयी झालेत. जिचकार ८२ तर पार्डीकर ८० मतांनी विजयी झालेत. महापौरपदाच्या निवडणुकीत जिचकार यांना १०८, काँग्रेसच्या स्नेहा निकोसे यांना २६ मते,बसपाच्या वंदना चांदेकर यांना १० मते मिळाली. उपमहापौरपदाच्या निवडणुकीत पार्डीकर यांना १०८, बसपाचे नरेंद्र वालदे यांना १० तर कॉंग्रेसचे नितीश ग्वालबन्सी यांना २८ मते मिळाली.

मनपाच्या टाऊन हॉल मध्ये आज ५ मार्च रोजी सकाळी १० वाजता महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पद निवडीसाठी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. मतदानाद्वारे सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांनी मतदानात सहभाग नोंदविला.

प्रारंभी मनपा सभागृहाचे पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी सचिन कुर्वे यांनी मतदान निवड प्रक्रियेची माहिती उपस्थित सदस्याना दिली. निगम सचिव हरीश दुबे यांनी त्यांच्याकडे आलेल्या नामनिर्देशित अर्ज यांची संख्या आणि नावे वाचून दाखवली. महापौर पदासाठी एकूण ६ नामनिर्देशित अर्ज प्राप्त झाले असून यापैकी 3 अर्ज भाजपच्या नंदा शरद जिचकार, 2 अर्ज कॉंग्रेसच्या वंदना चांदेकर व 1 अर्ज बसपच्या स्नेहा निकोसे यांचे असल्याचे त्यांनी सांगितले. या नावासाठी मतदान प्रक्रिया पार पडली. सभागृहातील एकूण १५१ सभासदांपैकी १४९ सभासद उपस्थित होते. मतदानात नंदा जिचकार यांना १०८ मते, स्नेहा निकोसे यांना २६ मते तर वंदना चांदेकर यांना १० मते पडलीत. तीन नगरसेवक तटस्थ राहिलेत.

उपमहापौर पदासाठी भाजपतर्फे दीपराज पार्डीकर, काँगेस तर्फे नितीन ग्वालबंशी तर बसपतर्फे नरेंद्र वालदे यांनी निवडणूक लढवली. यात दीपराज पार्डीकर यांना १०८ मते, नितीन ग्वालबंशी यांना २८ मते तर नरेंद्र वालदे यांना १० मते पडलीत. तीन मते तटस्थ राहिलीत. दीपराज पार्डीकर हे विजयी झाले.

महापौर पदी निवड झाल्यावर नंदा जिचकार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष सभेत स्थायी समितीवर १६

सदस्यांची नावे घोषित करण्यात आली. १०८ सभासद असणाऱ्या भाजपची तौलनिक संख्या बळ ११.४५ टक्के, काँग्रेसचे ३.७ टक्के तर बसपचे १.०६ टक्के एवढे घोषित करण्यात आले. यामुळे भाजपतर्फे एकूण 12 सदस्यांची नावे घोषित करण्यात आली. यामधे संदीप जोशी, नंदिता गिरे,रिता मुळे, उषा पॅलेट, बाली हत्तीठेले, भाग्यश्री कानतोडे, नेहा वाघमारे, सरला नायक, मनीषा कोठे, सरिता कापरे, लता काडगळे, जयश्री वाडीभस्मे यांचा समावेश आहे.

बसपतर्फे एक सदस्य जितेंद्र घोडेस्वार यांचे नाव घोषित झाले तर काँग्रेस पक्षाने त्यांच्या 3 सभासदांची नावे पुढील सभेत घोषित करणार असल्याचे सांगितले. या वेळी विरोधी पक्ष नेते पदी कॉग्रेसच्या संजय महाकाळकर यांची निवड करण्यात आली.

• • • • • • • • • • • •

# प्रत्येक दोन महिलांना सक्षम करुन महिला दिवस करा सार्थ – महापौर




महिला या खूप मेहनती असतात. प्रसंगी आपल्या आरोग्याकडेही दुर्लक्ष करतात.महिलांनी आपले आरोग्य आधी जपावे. ‘बी बोल्ड फॉर चेंज’ याचा अर्थ सक्षमतेकडे वाटचाल करण्याकरीता धाडसी व्हा, असा आहे. प्रत्येक महिलेने स्वत: सक्षम होण्यासोबतच दोन महिलांना सक्षम करण्याचा प्रण करावा असे आवाहन महापौर नंदाताई जिचकार यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेच्या समाजकल्याण विभागातर्फे सिव्हील लाईन्स स्थित मनपा मुख्यालयातील हिरवळीवर आयोजित कार्यक्रमात त्या अध्यक्षनावरुन बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर राज्य महिला आयोगाच्या सदस्य नीता ठाकरे, कौटुंबिक न्यायालय वकील संघाच्याअध्यक्ष् ॲड. तेजस्विनी खाडे, मातृसेवा संघ कुटुंब समुपदेशन केंद्राच्या सहयोगी प्राध्यापक तथा सहयोगी संचालक डॉ. ज्योती निसवाडे, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) लिना फलके, डॉ. उज्वला देशमुख, समाजसेविका तक्षशिला वाघधरे, समाजसेविका वीणा खानोरकर, मनपा उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कृतज्ञता सोहळ्यात महापौर नंदाताई जिचकार यांच्या शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यानंतर सर्व नगरसेविकांना महापौर नंदाताई जिचकार आणि राज्य महिला आयोगाच्या सदस्य नीता ठाकरे यांच्या हस्ते मानपत्र व तुळशीचे रोप देऊन सन्मानित करण्यात आले. तर समाजकल्याण विभागातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने डॉ. रंजना लाडे यांचा महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी बोलताना तक्षशिला वाघधरे, ज्योती निसवाडे, ॲड. तेजस्विनी खाडे, ज्योती निसवाडे, डॉ.उज्ज्वला देशमुख, वीणा खानोरकर आदी मान्यवरांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. राज्य महिला आयोगाच्या सदस्य निता ठाकरे यांनी सगळ्या नगरसेविकांचा सन्मान हा जणू शहरातील प्रत्येक महिलेचा सन्मान असल्याचे सांगितले. राज्य महिला आयोग महिलांसाठी करीत असलेल्या कामांचे त्यांनी विवेचन केले. सर्व सत्कारमूर्ती नगरसेविकांच्या वतीने नगरसेविका रुपा रॉय यांनी विचार मांडले.

याप्रसंगी सगळ्या झोन मधील स्वच्छतादूतांना महापौरांचा हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सादर झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात मनपाच्या समस्त महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गीत, संगीत व कवितांचा

मनसोक्त आंनद लुटला. संचालन आनंद आंबेकर यांनी केले.आभार कल्पना मेश्राम यांनी मानले.

**मतदार यादीत नाव नोंदणीसाठी महिलांसाठी खास मोहीम**

यावेळी महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा प्रशासनातर्फे मतदार यादीत नाव नोंदणीसाठी महिलांसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. याअंतर्गत मतदार यादीत नाव नोंदविण्याची सोय कार्यक्रमस्थळीच उपलब्ध करुन दिली होती. यावेळी महापौर नंदा जिचकार आणि उपजिल्हाधिकारी लीना फालके यांच्या हस्ते चार महिला मतदारांना मतदार ओळखपत्र प्रदान करण्यात आले. पुढील सात दिवस या उपक्रमाचा लाभ शहरातील महिलांना घेता येईल.

• • • • • • • • • • • •

# तंत्रज्ञान आणि आधुनिक पायभूत सुविधांसाठी नागपूरचा सन्मान



**मुंबईतील शिखर परिषदेत 'इकोनॉमिक्स अवार्ड' प्रदान**

मुंबईतील नरीमन पॉइंट येथे सुरू असलेल्या शिखर परिषदेत नागपूर शहराला अत्याधुनिक पायभूत सुविधा आणि तंत्रज्ञान विकासासाठी 'इकोनॉमिक्स अवार्ड' देऊन सन्मानित करण्यात आले. नागपूरच्या मह wasापौर नंदाताई जिचकार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

यावेळी नागपूर महानगर पालिकेचे अप्पर आयुक्त डॉ. रामनाथ सोनवणे, आ. राम पुरोहित, डॉ. निरंजन हिरचंदानी उपस्थित होते. या शिखर परिषदेला देश-विदेशातील अनुभवी तज्ञ सहभागी झाले आहेत. पायभूत सुविधांच्या विकासामधे तसेच नागरिकांना दैनंदिन सेवा पुरविन्यासाठी माहिती व् तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर नागपूर महानगर पालिकेतर्फे करण्यात येत असल्यामुळे देशातील इतर शहरांना मागे टाकीत नागपूर शहराने हा बहुमान पटकाविला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शहरात विविध विकास प्रकल्प राबविण्यात येत आहेत. यात नागरिकांचा सक्रीय सहभाग मिळत असल्यामुळेच हा बहुमान प्राप्त झाल्याची प्रतिक्रिया महापौर नंदाताई जिचकार यांनी दिली. सर्व प्रकल्प प्राभाविपने राबवित असल्याबद्दल आयुक्त श्रावण हर्डीकर यांचेही कौतुक महापौर यांनी केले. या सन्मानामुळे स्मार्ट सिटी कड़े वाटचाल करणाऱ्या नागपूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला.

• • • • • • • • • • • •

# कामाच्या प्रगतीनुसार मनपा करेल मेट्रो साठी तरतूद

**जमिनी देण्याची प्रक्रिया सुरू : रोखची तरतूद लवकरच**




'नागपूर मेट्रो' हा शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून या प्रकल्पात महानगरपालिकेची भागीदारी पाच टक्के आहे. या प्रकल्पासाठी मनपातर्फे जमिनी देण्याचे काम सुरू झाले आहे. कामाच्या प्रगतीनुसार रोख स्वरूपातील वित्तीय तरतूद करण्यात येईल, अशी माहिती नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली. ते म्हणाले, नागपूर मेट्रो प्रकल्पात नागपूर महानगरपालिकेची भागीदारी दोन स्वरूपातील आहे. एक जमीन स्वरूपात आणि दुसरी रोख स्वरूपात.

पाच टक्के भागीदारीनुसार महानगरपालिकेचा वाटा ४३४ कोटी रुपयांचा आहे. यात महापालिका ज्या जमिनी प्रकल्पाला देणार आहे त्याचे मूल्य ३६१ कोटी रुपये आहे तर ७३ कोटी रुपये रोख स्वरूपात देण्यात येणार आहे. मेट्रो प्रकल्पाला जमिनी देण्याच्या ठरावाला नुकतीच सभागृहात मंजुरी मिळाली असून मेट्रोकडे त्या सोपविण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. काम जसजसे प्रगतीपथावर जाईल, तसतशी वित्तीय तरतूद केली जाईल, असेही श्री. हर्डीकर यांनी सांगितले.

• • • • • • • • • • • •

# एप्रिलमध्ये नागपुरात दोन दिवसीय स्मार्ट सिटी शिखर संमेलन

**देशभरातील महापौर, आयुक्तांची उपस्थिती : विविध विषयांवर चर्चासत्र आणि प्रदर्शन**

‘स्मार्ट सिटी’ प्रकल्पांतर्गत नागपुरात ७ आणि ८ एप्रिल रोजी हॉटेल ली-मेरिडीयन येथे दोन दिवसीय शिखर संमेलन आणि परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात देशभरातून ‘स्मार्ट सिटी’ प्रकल्पासाठी निवड झालेल्या १०० शहरातील महापौर, आयुक्तांसह पदाधिकारी व अधिकारी सहभागी होणार आहेत.

या संमेलनात स्मार्ट सिटी प्रकल्प अंमलबजावणी, विविध योजना, उपक्रमांबाबत देशारतील तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. याशिवाय विदेशातील स्मार्ट सिटी प्रकल्प राबविणारे तज्ज्ञही अत्याधुनिक प्रकल्पाबाबत माहिती देतील. सदर संमेलनात उद्घाटनानंतर ‘स्मार्ट गव्हर्नस’, ‘स्मार्ट मोबीलिटी’, ‘स्मार्ट एनव्हिरॉर्नमेंट’, ‘स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर’ अशा चार भागात विभागले जाईल. एकाच वेळी चार विविध सभागृहात संबंधित वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात येईल. दोन दिवसांतील या भरगच्च कार्यक्रमासोबतच प्रदर्शन आणि फील्ड विजीटचेही आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

• • • • • • • • • • • •

# तरुणाई आणि संधीमधील सेतू म्हणजे रोजगार मेळावा : देवेंद्र फडणवीस




**युथ एम्पॉवरमेंट समीट : पहिल्याच दिवशी १०५८ तरुणाईला रोजगार**

मागील तीन वर्षांपासून प्रा. अनिल सोले यांच्या मार्गदर्शनाखाली या रोजगार मेळाव्याचे आयोजन होत आहे. हा मेळावा म्हणजे सोले यांनी तरुणाईला उपलब्ध करुन दिलेला प्रगतीचा रस्ता असून तरुणाई आणि संधी या दोघांमध्ये असे मेळावे सेतूचे काम करीत असते, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सिव्हील लाईन्स स्थित वसंतराव देशपांडे सभागृहात नागपूर महानगरपालिका, फॉर्च्यून फाऊंडेशन व ईसीपीएतर्फे आयोजित तीन दिवसीय युथ एम्पॉवरमेंट समीटच्या दुसऱ्या दिवशी तरुणाईला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. याप्रसंगी मंचावार ऊर्जामंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे, आमदार प्रा. अनिल सोले, आमदार सुधाकरराव देशमुख, आमदार डॉ. मिलिंद माने, आमदार परिणय फुके, मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, जिल्हा परिषद अध्यक्ष निशा सावरकर, मनपा उपायुक्त डॉ. रंजना लाडे, ईसीपीएचे सचिव कुणाल पडोळे, बार्टीचे संचालक राजेश ढाबरे आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, असे मेळावे म्हणजे डाट्स कनेक्शनचे कार्य करते. एकीकडे तरुणाई आहे जिच्या हाताला काम नाही, दुसरीकडे उद्योग क्षेत्र आहेत ज्यांना कौशल्यप्राप्त मानव संसाधनाची गरज असते. तरुणाई आणि संधी या दोघामध्ये सेतूचे कार्य हा मेळावा करतो. याप्रसंगी बोलताना देश एका महत्त्वाच्या संक्रमणातून जात असल्याचे सांगितले. जगातील सर्वात तरुण देश म्हणून भारताची ओळख आहे. या तरुणाईला मानव संसाधनामध्ये परिवर्तीत केल्यास ते स्वत:च्या, देशाच्या व जगाच्या विकासात योगदान देऊ शकतील. रोजगाराच्या भरपूर संधी आज तरुणाईला उपलब्ध झाल्या असून हातातील मोबाईलवरच राज्य शासनाच्या पाचशे सेवा उपलब्ध आहेत. त्यामुळे या संधीचा लाभ घ्या; कारण परिवर्तनात जो सहभागी होणार नाही तो कधीच विकसित होणार नसल्याचे त्यांनी सांगितले. जीडीपीबाबत बोलताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इतर देशाच्या तुलनेत देशाचा विकास दर आज ७.५ पर्यंत पोहोचवला आहे यावरुन देशातील तरुणाईला त्यांच्यातील अभिजात गुणांचा लाभ घेण्याची किती व कशी संधी उपलब्ध आहे हे लक्षात येईल, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी आव्हांनाना आव्हान देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी तरुणाईला केले. यासाठीच वेगवेगळे कौशल्य प्राप्त

करा असे सांगताना अपयशातून खचून जाऊ नका असा सल्ला तरुणाईला दिला. संधी ही सीढीसारखी असते. आम्ही जसे आहोत तसेच राहू ही मानसिकता सोडा व आपल्या स्वप्नांना बळ द्या, असे आवाहन त्यांनी केले.

विदर्भ-मराठवाड्यातील तरुणाईला मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी- बावणकुळे यावेळी बोलताना पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांनी मिहानमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ५० हजार युवकांना रोजगार देण्याचे स्वप्न पाहिले होते, त्यावेळी ज्या ४९ कंपनी जास्त वीज दरामुळे मिहान सोडून गेल्या त्यांना ४.५० अश्या अत्यल्प दराने वीज देऊन पुन्हा मिहानमध्ये आणले जात असल्याचे त्यांनी सांगितले. २२ हजार आयटीआय इलेक्ट्रीकल तंत्रज्ञ निवड करुन त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. याप्रसंगी विदर्भ, मराठवाड्यातील बेरोजगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या अनेक उपक्रमांची माहिती त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे संचालन रेणुका देशकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महानगरपालिकेच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे यांच्या मार्गदर्शनात प्रकल्प व्यवस्थापक विनय त्रिकोलवार, नूतन मोरे, फॉर्च्यून फाऊंडेशनचे विजय देवगडे, शैलेश ढोबळे, नीलेश पोद्दार, आशीष वांदिले, किशोर पाटील यांचे सहकार्य लाभत आहे.

वैशिष्ठे

- मेळाव्यात दुसऱ्याच दिवशी १०५८ तरुणाईला मिळाला रोजगार

- कार्यक्रामत मुख्यमंत्रयांच्या हस्ते विविध स्टॉल धारक यांच्या अधिकाऱ्यांचे, रोजगार मिळविणाऱ्या युवकांचे स्वागत करण्यात आले.

- या भव्य कार्यक्रमाचे आयोजन करणाऱ्या जहीर भाई यांचा सत्कार मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्यात आला.

- अंजुमन कॉलेजच्या कुमारी आफरिन शेख हिने समस्त विद्यार्थ्यांच्या वतीने मुख्यमंत्री यांना त्यांचेच पोट्रेट प्रदान केले.

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाषणानंतर सभागृहात उपस्थितांमध्ये जाऊन त्यांच्यासोबत छायाचित्रे काढून घेतलीत.

.

• • • • • • • • • • • •

# प्रबोधनात्मक ' दोन रेघी वही ' ने रसिकांना जिंकले



**दिव्यांगांना प्रबोधन करणारी राज्यातील पहिली एकांकिका**

सामान्य शाळेत एखाद्या दिव्यांगाला दिलेली वागणूक आणि देण्यात आलेले शिक्षण यामुळे किती मोठा बदल त्यांच्या जीवनात घडतो याचे प्रबोधनात्मक सादरीकरण म्हणजे नागपूर महानगरपालिका शिक्षण विभागातर्फे सादर होणारी ' दोन रेघी वही..एक प्रवास शिक्षणाकडे' हि एकांकिका.

शुक्रवार ता 31 मार्च रोजी वसंतराव देशपांडे सभागृहात या एकांकिकेचे सादरीकरण झाले. प्रकाश या मतीमंद मुलाला त्याचे पालक सामान्यांच्या शाळेत शिकवण्याचा निर्णय घेतात. आपल्या 'विशेष' असलेल्या मुलाला शाळेत कशी वागणूक मिळेल याचा तणाव या पालकांनाही असतो मात्र त्यांचा निर्धार कायम असतो. लवकरच प्रकाश सामान्य मुलांमध्ये रुळतो, बघता बघता 12 वी चा टॉपर होतो, पुढे उच्च शिक्षण घ्यायला पुण्यात जातो आणि सॉफ्टवेअर इंजिनिअर होऊन एका नामांकित कंपनीत मोठया पदावर पोहोचतो. त्याला 'बिजनेस एक्सिलेन्स एमप्लोई' हा पुरस्कार मिळतो, माझ्या पालकांनी जर मला सामान्यांच्या शाळेत शिकवण्याचा निर्णय घेतला नसता तर कुठेतरी मी आजहि उपेक्षित जगणं जगत असतो असे मनोगत पुरस्कार स्वीकारताना तो व्यक्त करतो !

'दोन रेघी वही' याचा अर्थ पहिली रेघ ध्येय आणि दुसरी रेघ विश्वास हा संदेश देऊन एकांकिका संपते. नागपूर महानगरपालिकेतर्फे दिव्यांगांना प्रबोधन करणारी महाराष्ट्रातील हि पहिली एकांकिका आहे. एकांकिकेतील प्रकाश हे पात्र जेव्हा ' समाजाने माझा स्वीकार केला' त्याबद्दल आभार मानतो तेव्हा संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गडगडाट त्याचे उस्फुर्त स्वागत करतो आणि येथेच हि एकांकिका रासिकांचे मन जिंकण्यास यशस्वी होते. कार्यक्रमाचा प्रारंभ महापौर नंदाताई जिचकार, शिक्षण सभापती दिलीप दुबे, अति. आयुक्त रविंद्र कुंभारे, उपायुक्त रवींद्र देवतळे, शिक्षण अधिकारी फारुख शेख, डॉ. उदय बोधनकर आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाला. विशेष विद्यार्थ्यांनी या नंतर नांदी सादर केली. प्रास्ताविक समन्वयक अभिजित राऊत यांनी केले. लेखिका प्रियंका नंदनवार,संकल्पना अभिजित राऊत, दिग्दर्शन चेतन्य दुबे यांचे होते.निर्मिती

सहयोग . कलाविष्कार मल्टिमीडिया यांचे होते. नागपूर महानगरपालिका सर्व शिक्षा अभियान समावेशीत शिक्षणतर्फे सादर झालेल्या या एकांकिकेला रसिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली.

**यांचा झाला सत्कार**

यावेळी शिक्षण सभापती दिलीप दिवे व शिक्षणाधिकारी फारुख शेख यांच्या हस्ते उत्कृष्ट मुख्याध्यापक-शिक्षक सन्मान पारितोषिक, उत्कृष्ट विध्यार्थी सन्मान पारितोषिक, उत्कृष्ट विशेष शिक्षक सन्मान पारितोषिक तसेच उत्कृष्ट विशेष तज्ञ सन्मान पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी मंचावर सुप्रसिद्ध नाट्य कलावंत विनोद राऊत, महेश रायपूरकर उपस्थित होते.

.

• • • • • • • • • • • •